# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**प्रस्तावना**

**विषय :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२३-२४ अंतर्गत भिवंडी पश्चिम १३६ विधानसभा क्षेत्रातील भिवंडी मनपा हाद्दीतील मागास वर्गीय वस्ती भागातील अंतर्गत सी.सी.रस्ते, गटार, पेव्हरब्लॉक,पाथवेज,संरक्षण भिंत,सामाजिक सभागृह इ.विकास कामाच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकिय मान्यतेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मागाास वर्गीय वस्तीमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अंतर्गत महाराष्ट्र शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्र.सावियो २०२३/प्र.क्र./५७६/अजाक दि.१० जानेवारी मंत्रालय अन्वये महानगरपालिका क्षेत्रात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अंतर्गत सी.सी.रस्ते गटार,पेव्हरब्लॉक,पाथवेज,संरक्षण भिंत,सामाजिक सभागृह इ.विकास कामे करणे कामी रु.२,९९,९९,३७१/- मात्रच्या प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यास शहर अभियंता,मुख्य लेखा परिक्षक,मुख्य लेखा व वित्त् अधिकारी,मा.अतिरीक्त आयुक्त यांची शिफारस आहे.सदर प्रस्तावास भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेच्या सर्व अटी व निकष लागू आहेत.

शासन आदेश क्र. एम.सी.ओ.२०२०/ प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जुन २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी मा.प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत.त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पाहात आहेत.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतूदीनूसार सदरच्या प्रस्तवास मंजुरी करण्याचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत.त्यानुसार सदरच्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रशासकिय मान्यतेकरीता पाठवयाचे असल्याने त्यास मंजुरीसाठी सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी पश्चिम १३६ विधानसभा क्षेत्रातील भिवंडी मनपा हाद्दीतील मागासवर्गीयवस्तीमध्ये सी.सी.रस्ते,गटार,पेव्हरब्लॉक,पाथवेज,संरक्षण भिंत,सामाजिक सभागृह इ.विकास कामे करणे | २,९९,९९,३७१/- |

ठराव क्र. ४३० दिनांक :-१५/३/२०२४

मा.जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे उपरोक्त सादर केलेल्या विकासाचे कामे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेच्या निकषात बसत असून उपरोक्त नमूद कामाची निकड लक्षात घेता सदर योजने अंतर्गत विकास कामे करणेकामी विभागाने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एम.सी.ओ.२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि- १४, दि.०६जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिनिशमनपा उपरोक्त नमूद प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे प्रशासकीय मंजुरी करीता पाठविणेस मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)

प्रशासक तथा आयुक्त

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

मे सादर,

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग

**प्रस्तावना-**

अग्निशमन विभागाला आगीच्या व रेस्कयु वर्दीवर काम करणेकरिता एक नग मल्टीपरपझ फायर इंजिन व एक नग १४ हजार लिटर क्षमतेचा वॉटर ब्राउझर चे FABRICATION AND SUPPLY करणेबाबत बाबतची ई निविदा सुचना क्र.१ सन २०२३-२४ ची ई निविदा क्रं. १०१५४६० ची तांत्रिक कागदपत्रे (टेकनिकल बीड) दिनांक-०४/०३/२०२४ रोजी दु.४.०० वाजता उघडण्यात आले. सदर निविदांचे छाननी अंती तीन निविदा निविदासमितीने पात्र ठरविल्या व सदर तीन पात्र निविदाकारांची आर्थीक (फायनांशियल बिड) (टी-२) दिनांक- ११/०३/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा उघडण्यात आलेले असुन मे. निधी इंटरप्रायजेस, मुंबई यांची सर्वात कमी दराची निविदा रु.३,६५,९४,०००/- (अक्षरी- तीन कोटी पासष्ट लाख चौ-यान्नव हजार रु. मात्र)इतक्या रकमेची होत आहे.

मे. निधी इंटरप्रायजेस,मुंबई यांची सर्वात कमी दराची निविदा रु.३,६५,९४,०००/- (अक्षरी- तीन कोटी पासष्ट लाख चौ-यान्नव हजार रु. मात्र) इतक्या रकमेची असल्याने त्यास मा.उपआयुक्त (मुख्या),मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व विधी अधिकारी यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक- रोजी पुर्व मान्यता दिलेली आहे. त्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव.

**ठराव क्रं.** ४२८ **दिनांक-**१५/03/2024

अग्निशमन विभागाला आगीच्या व रेस्कयु वर्दीवर काम करणेकरिता एक नग मल्टीपरपझ फायर इंजिन व एक नग १४ हजार लिटर क्षमतेचा वॉटर ब्राउझर चे FABRICATION AND SUPPLY करणे करिता मे. निधी इंटरप्रायजेस,मुंबई यांचेकडुन खरेदी करण्याकरिता रु.३,६५,९४,०००/- (अक्षरी- तीन कोटी पासष्ट लाख चौ-यान्नव हजार रु. मात्र) च्या खर्चास महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र ७१/नवि १४, दिनांक ०९ नोव्हेबंर २०२० अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ दिनांक-०२/११/२०२० अन्वये अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मंजुरी देत असनु मे. निधी इंटरप्रायजेस,मुंबई यांचे सोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय:- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दितील गटार,नाला पेव्हरब्लॉक व इतर विकास कामे करणे (प्रभाग समिती क्र.२ कार्यक्षेत्रा अंतर्गत)**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दितील गटार,नाला पेव्हरब्लॉक व इतर विकास कामे करणे (प्रभाग समिती क्र.२ कार्यक्षेत्रा अंतर्गत) कामी रक्कम रु.९९,९९,३७५/- मात्र प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक १४/०२/२०२४ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन त्यानुसार जा.क्र.जिनिस/जिवायो/नगरोत्थान/का-४/२०२३-२४/८४७ दि.२७/०२/२०२४ नुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,यांचे कडुन प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ९९,९९,३७५/- ई-निविदा सुचना क्र.१९०/२०२३-२४ (१०१७२७२) दि.०१/०३/२०२४ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.०१/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण ५निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी पात्र झालेल्या निविदा खालीलप्रमाणे आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | मे.हिंदुस्तान इंटरप्राजयेस | अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.०१० % जादा दराने |
| २ | **मे.चंडीका कन्स्ट्रक्शन** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा २.९५ % कमी दराने** |
| ३ | सुजित बाळासाहेब खरात | अंदाजपत्रकिय दरापेक्षा २.५३ % कमी दराने |

वरील पैकी मे.चंडीका कन्स्ट्रक्शन, यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा २.९५% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.९७,०४,३२०/- (रु.सत्याण्णव लाख चार हजार तीनशे वीस मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- 826

दिनांक :-15 / 3 /२०२४

मे.चंडीका कन्स्ट्रक्शन, यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा २.९५% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.९७,०४,३२०/- (रु.सत्याण्णव लाख चार हजार तीनशे वीस मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दितील गटार,नाला पेव्हरब्लॉक व इतर विकास कामे करणे (प्रभाग समिती क्र.२ कार्यक्षेत्रा अंतर्गत) कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.चंडीका कन्स्ट्रक्शन,, यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

**विषय :- प्र.स.क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील नाले सफाई कामा करिता प्राप्त झालेल्या निविदाकार व त्यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत.**

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षा करिता प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील लहान मोठे नाले सफाईचे काम हे मान्सुन पुर्व तयारीचा काळ असल्याने प्रथम प्राधान्याने होणा-या खर्चास प्रस्तावित करण्यात आले होते.परंतु सदर कालावधी सदर कामाचा लेखा शिर्ष मंजुर नसल्याने निविदा प्रसिद्ध करणे कामी मा.आयुक्त सो. यांनी दि.१४/०२/२०२४ रोजी मान्यता दिली होती.

प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील मा.आयुक्त सो. यांनी निविदा प्रक्रिया करणेसाठी दिलेल्या मान्यतेनुसार नाल्यांची सफाई करणेचे काम पावसाळ्यापुर्वी करणे आवश्यक असल्याने व सदरचे काम तातडीचे बाब असल्याने दि.२१/२/२०२४ ते दि.४/३/२०२४ या कालावधीत ई निविदा काढण्यात आली होती. निविदा कालावधीत ३ प्राप्त झाले असून सदर निविदाधारक यांचे निविदेच्या अटी शर्तीनुसार दस्तऐवजाची पाहणी करण्यात आली असता प्राप्त निविदाकार यांनी निविदेच्या अटी शर्तीची पुर्तता पुर्ण केली असल्याने ३ पात्र निविदाधारक यांची निविदा दि.६/०३/२०२४ रोजी खुले करण्यात आले असता प्राप्त दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | निवीदाकाराचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम | प्राप्त दर | प्राप्त निवीदा दर रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मे.झापी ॲण्ड कंपनी,उल्हासनगर | रु.४४,६९,७८९/- | -९.९९ % | रु.४०,२३,२५७/- |
| २ | मे.चंडिका कन्स्ट्रक्शन,भिवंडी | रु.४४,६९,७८९/- | -१७.०० % | रु.३७,०९,९२५/- |
| ३ | मे.बुबेरे ॲण्ड असोसिएट्स,भिवंडी | रु.४४,६९,७८९/- | -२.०० % | रु.४३,८०,३९३/- |

नाले सफाईचे काम करणेसाठी मे.चंडिका कन्स्ट्रक्शन,भिवंडी यांची निविदा L1 आहे.

महानगरपालिकेचे अंदाजपत्रकिय दर रु.४४,६९,७८९/- इतके असल्याने सर्वात कमी असलेले दर हे अंदाजपत्रकिय दरापेक्षा -१७.००% टक्केने कमी सादर केले आहेत

प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील नाले सफाईचे काम करणेसाठी कनिष्ठ अभियंता यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.४४,६९,७८९/- इतकी असल्याने सादर केलेल्या खर्चास प्रशासकिय मंजुरी असणे आवश्यक असल्याने मान्यता मिळावी व निविदे द्वारे मे.चंडिका कन्स्ट्रक्शन,भिवंडी यांनी सादर केलेल्या खर्च रक्कम रु.३७,०९,९२५/- इतक्या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी.ही विनंती.

प्रशासकिय ठराव क्र. ४२६० दि.१५/०३ /२०२४

प्रभाग समिती क्रं.५ च्या कार्यक्षेत्रात नाले सफाई कामी मे.चंडिका कन्स्ट्रक्शन ,भिवंडी यांनी रु.३७,०९,९२५/-असे दर सादर केले असून सादर केलेल्या निविदाकारक यांना व त्यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्रं.५ च्या कार्यक्षेत्रातील नाले सफाई कामी कनिष्ठ अभियंता (बांधकाम) यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकीय रु.४४,६९,७८९/- इतक्या रक्कमेस मंजुरी व ई-निविदेद्वारे प्राप्त झालेले सर्वात कमी खर्चाचे निविदाकार मे.चंडिका कन्स्ट्रक्शन ,भिवंडी यांनी सर्वात कमी असलेले दर हे अंदाजपत्रकिय दरापेक्षा -१७.००% टक्केने कमी ने सादर केल्याने (रु.३७,०९,९२५/-) सदर निविदाकार व सादर केलेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

**विषय :- प्र.स.क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील नाले सफाई कामा करिता प्राप्त झालेल्या निविदाकार व त्यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत.**

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षा करिता प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील लहान मोठे नाले सफाईचे काम हे मान्सुन पुर्व तयारीचा काळ असल्याने प्रथम प्राधान्याने होणा-या खर्चास प्रस्तावित करण्यात आले होते.परंतु सदर कालावधी सदर कामाचा लेखा शिर्ष मंजुर नसल्याने निविदा प्रसिध्द करणे कामी मा.आयुक्त सो. यांनी दि.१४/०२/२०२४ रोजी मान्यता दिली होती.

प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मा.आयुक्त सो. यांनी निविदा प्रक्रिया करणेसाठी दिलेल्या मान्यतेनुसार नाल्यांची सफाई करणेचे काम पावसाळ्यापुर्वी करणे आवश्यक असल्याने व सदरचे काम तातडीचे बाब असल्याने दि.२१/२/२०२४ ते दि.४/३/२०२४ या कालावधीत निविदा प्रसिध्द निविदेस ३ निविदाकार प्राप्त झाले असून सदर निविदाधारक यांचे निविदेच्या अटी शर्तीनुसार दस्तऐवजाची पाहणी करण्यात आली असता प्राप्त निविदाकार यांनी निविदेच्या अटी शर्तीची पुर्तता पुर्ण केली असून ३ पात्र निविदाधारक यांची निविदा दि.६/०३/२०२४ रोजी खुले करण्यात आले असता प्राप्त दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | निवीदाकाराचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम | प्राप्त दर | प्राप्त निवीदा दर रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मे.झापी ॲण्ड कंपनी, उल्हासनगर | रु.४१,४१,९८३/- | - ९.९९ % | रु.३७,२८,१९९/- |
| २ | मे.चंडिका कन्स्ट्रक्शन,भिवंडी | रु.४१,४१,९८३/- | - १२.५१ % | रु.३६,२३,८२१/- |
| ३ | मे.बुबेरे ॲण्ड असोसिएट्स,भिवंडी | रु.४१,४१,९८३/- | - ५.०० % | रु.३९,३४,८८४/- |

नाले सफाईचे काम करणेसाठी मे.चंडिका कन्स्ट्रक्शन,भिवंडी यांची निविदा L1 आहे.

महानगरपालिकेचे अंदाजपत्रकिय दर रु.४१,४१,९८३/- इतके असल्याने सर्वात कमी असलेले दर हे अंदाजपत्रकिय दरापेक्षा-१२.५१% टक्केने कमी सादर केले आहेत.

प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील नाले सफाईचे काम करणेसाठी कनिष्ठ अभियंता यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.४१,४१,९८३/- इतकी असल्याने सादर केलेल्या खर्चास प्रशासकिय मंजुरी असणे आवश्यक असल्याने मान्यता मिळावी व निविदे द्वारे मे.चंडिका कन्स्ट्रक्शन,भिवंडी यांनी सादर केलेल्या खर्च रक्कम रु.३६,२३,८२१/- इतक्या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी.ही विनंती.

प्रशासकिय ठराव क्र. ४२६ दि.१५/03/२०२४

प्रभाग समिती क्रं.४ च्या कार्यक्षेत्रात नाले सफाई कामी मे.चंडिका कन्स्ट्रक्शन,भिवंडी यांनी रु.३६,२३,८२१/- असे दर सादर केले असून सादर केलेल्या निविदाकारक यांना व त्यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्रं.४ च्या कार्यक्षेत्रातील नाले सफाई कामी कनिष्ठ अभियंता (बांधकाम) यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकीय रु.४१,४१,९८३/- इतक्या रक्कमेस मंजुरी व ई-निविदेद्वारे प्राप्त झालेले सर्वात कमी खर्चाचे निविदाकार मे.बुबेरे ॲण्ड असोसिएट, भिवंडी यांनी सर्वात कमी असलेले दर हे अंदाजपत्रकिय दरापेक्षा -१२.५१ % टक्केने कमी ने सादर केल्याने (रु.३६,२३,८२१/-) सदर निविदाकार व सादर केलेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका